**इचलकरंजी महानगरपालिका**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**जाहीर निविदा सूचना ०१/२०२३-२४**

इचलकरंजी महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडून महानगरपालिका फंड अंतर्गत खालील नमूद काम करुन देणेसाठी अनुभवी मक्तेदार यांचेकडून परसेंटेज रेटची जाहिर निविदा मागविणेत येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | निविदा रक्कम | बयाणा रक्कम रुपये | कोरी निविदा र.रुपये GST सह | कामाची कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | इचलकरंजी महानगरपालिकेकरीता नव्याने तयार करणेत आलेले लोगो डिझाईनची प्रतिकृती तयार करुन बसविणे. | १,१८,५००/- | १९००/- | २३६/- | १५ दिवस |

वरील कामी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.

**अ) लिफाफा क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१) बयाणा रक्कमेची इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेतील कामाची मुदत अधिक ६ महिने इतक्या कालावधीची इ.म.पा. च्या नांवे मुदतठेव पावती (मुळ प्रत.) अथवा धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त इ.म.पा.च्या नावाने काढणे.
२) कामाचा अनुभव असलेस त्याची कागदपत्रे.
३) मक्तेदाराचे पॅन कार्ड याची सत्य प्रत.
४) नविन जी.एस.टी.कर प्रणालीनुसार निविदा भरणेची आहे. जी.एस.टी. रजिस्ट्रेशन आवश्यक आहे.
५) गुणदोष दायित्व कालावधी (Defect liability period- २ वर्ष) काम पुर्ण झालेनंतर २ वर्ष
६) वरील कागदपत्रांची सत्यप्रत करुन कागदपत्रे जोडणेची आहेत (Self Attested)
७) फॉर्म 1B

**ब) लिफाफा क्रं.२ मध्ये खालील कागदपत्रे जोडावेत.**

१) मुळ निविदा फॉर्म मध्ये अक्षरी व अंकी नमूद केलेले दर विहीत केलेच्या जागेवर निविदा कारांने साक्षांकीत केलेले असावे.
२)एस्टीमेट पेक्षा कमी दराच्या निविदा असल्यास नियमाप्रमाणे राष्ट्रीयकृत बँकेची बँक हमी/डी.डी. जोडावी.
३)वरील दोन्ही लिफाफे सिल करुन ते एका लिफाफ्यात सिल बंद करुन त्यावर कामाचे नांव,मक्तेदाराचे नांव स्पष्टपणे नमूद करुन सदरील लिफाफा मुदतीत स्टोअर विभागाकडे निविदा पेटीत टाकावा.

**अटी -**

१) ज्यांची निविदा मंजुर होईल त्यांचे बिलातुन ९% इतकी रक्कम डिपॉझीटपोटी वजा करुन घेतली जाईल व काम पूर्ण झालेनंतर गुणदोष दायीत्व कालावधी (Defect liability period- २ वर्ष) संपल्यावर परत केली जाईल.
२) को-या निविदा इ.म.पा.च्या बांधकाम विभागामध्ये दि-२० /०८/२०२३ रोजी दु. १.३० वाजेपर्यंत रोखीने विकत मिळतील.
३) भरलेली निविदा इ.म.पा.स्टोअर मध्ये सादर करण्याची अंतिम दि२१ /०८/२०२३ दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील.
४) शक्य झालेस निविदा दि.२१ /०८/२०२३ इ.रोजी दुपारी ४.०० वाजता उपस्थित मक्तेदारांच्या समोर उघडणेत येईल.
५)कोणतीही निविदा मंजूर अथवा सर्व निविदा नामंजूर करणेचे अधिकार इ.म.पा.ने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.
६)मंजुर कामाची वर्कऑर्डर मक्तेदारास दिल्या नंतर ७ दिवसांच्या आत कामाची सुरुवात करणेची आहे. अन्यथा काम रद्द करणेत येईल याची नोंद घ्यावी.
७)एस्टीमेट दरापेक्षा कमी दराच्या निविदा असल्यास प्रथम न्यूनतम देकार सादर करणाऱ्या (L-१) निविदाकाराने Additional Performance Security Deposite आठ दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक राहिल प्रथम न्यूनतम देकाराच्या (L-१) निविदाकाराने मुदतीत AdditionL Performance Security Deposite भरणा केला नाही तर द्वितीय न्यूनतम देकाराच्या (L-२) निविदाकारास लेखी विचारणा करुन निविदा मंजूरीबाबतची पुढील कार्यवाही करणेत येईल.
८)कामाचे अंदाजपत्रक तसेच अटी व शर्ती संबंधित विभागात कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील

दि. ११/०८/२०२३

उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका